पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९१ ■ मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -291 ■ Tuesday, 11 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## सुरेश धसांनी पंकजा मुंडेंना सुनावलं, म्हणाले, जास्तीत जास्त लक्ष तुम्ही राखेवर द्या

**बीड**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नाशिक येथे लाँग मार्च आंदोलकांना भेटण्यासाठी आमदार सुरेश धस गेले होते. त्यावेळीचा त्यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आणि मोठी खळबळ निर्माण झाली. सतत होत असलेल्या टीकेनंतर सुरेश धस यांनी आपली भूमिका मांडलीये. हेच नाहीतर क्लिप मोडून तोडून व्हायरल केली आहे, असा आरोपही त्यांनी केलाय.



मात्र, सुरेश धस यांनी पोलिसांना माफ करा म्हटल्यानंतर त्यांच्या विधानाचा निषेध सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांकडून करण्यात आलाय. यावर स्पष्टीकरण देताना सुरेश धस दिसले.

यादरम्यान सुरेश धस यांनी आपला मोर्चा हा मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडेही वळवला. सुरेश धस म्हणाले की, शिट्टीवर घड्याळाच्या लोकांवर त्यांनी प्रेम करावे, भाजपच्या लोकांवर प्रेम करायला मी काफी आहे. पंकजा मुंडे यांनी मूळ मतदार संघात लक्ष द्यावे, तिकडे सगळच हायजॅक झाल आहे. आष्टी आता भाजपचा मतदार संघ कस काय झाला. फक्त केज मतदार संघ भाजपचा होता. परळी सोडून गेलेले व्यापारी बोलायला घाबरत आहेत.

**छगन भुजबळांचा गोपीनाथ मुंडे यांच्याबद्दल मोठा गौप्यस्फोट, म्हणाले, त्यांनी मला...**

पुढे सुरेश धस यांनी म्हटले की, पंकजा मुंडेंना विनंती आहे, जास्तीत जास्त लक्ष राखेवर द्यावे. परळीत ज्या गायरान जमिनी हडप केल्या आहेत तिथे लक्ष द्या. पंकजा मुंडे यांनी आष्टीबद्दल केलेल्या विधानानंतर सुरेश धस यावर बोलताना दिसले.

सुरेश धस यांनी थेट पंकजा मुंडेंना टार्गेट केल्याचे बघायला मिळतंय. गेल्या काही दिवसांपासून सुरेश धस यांच्याकडून सतत पंकजा मुंडे यांच्यावर आरोप केली जात आहेत.

काही दिवसांपूर्वीच पार पडलेल्या एका कार्यक्रमात सुरेश धस आणि पंकजा मुंडे हे एकाच मंचावर आल्याचेही बघायला मिळाले.

पंकजा मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीत माझा प्रचार केला नसल्याचे सांगताना सुरेश धस हे अनेकदा दिसले आहेत. पंकजा यांनी विरोधी उमेदवाराचा प्रचार केल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पंकजा मुंडे आणि सुरेश धस यांच्यात एक जोरदार वाद बघायला मिळतोय. सुरेश धस हे सातत्याने धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करताना दिसत आहेत.

## अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन सकारात्मक हवा- पालकमंत्री संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात औद्योगिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर येत आहे. जिल्ह्यात विविध सुविधांचा विकास करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून काम करावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज जिल्हा प्रशासकीय यंत्रणेला दिले.

येथील स्मार्ट सिटी कार्यालयात आज जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय यंत्रणांचा सर्वसाधारण आढावा पालकमंत्री शिरसाट यांनी घेतला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिणीयार, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व तहसिलदार आदी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांनी गौण खनिज, मातोश्री पाणंद रस्ते योजना, मनपा हद्दीतील जमिन मोजणी प्रकरणे, जिल्हा परिषदेचे विविध उपक्रम, जिल्हा परिषद इमारत बांधकाम, महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन, आरोग्य योजना, पोलीस दल अशा विविध विभागांचा आढावा घेतला.

शहरातील एका अपहरण प्रकरणात पोलिसांनी अवघ्या काही तासात तपास काम पूर्ण करुन अपहृत बालकाची सुखरुप सुटका केली त्याबद्दल पालकमंत्री शिरसाट यांनी पोलीसांचे अभिनंदन केले. पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, गौण खनिज प्रकरणी कारवाई करतांना पोलीस दल सोबत असावे याची खात्री महसूल विभागाने बाळगावी. तहसिलदार, मंडळ अधिकारी यांचा आढावा घ्यावा. लवकरच तालुकानिहाय जनसंवाद यात्रा सुरु करण्याचा आपला मानस असल्याचे पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले. ते म्हणाले की, अधिकाऱ्यांनी कामकाज करतांना येणाऱ्या अडचणींबाबतही सांगावे. त्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करु. अधिकाऱ्यांनी कामे करुन जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करुन द्याव्या. त्यास आपले प्राधान्य आहे. जनहिताची कामे वेळेत पूर्ण करावी. जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अधिक चांगली करावी. गुन्हेगारीची केंद्रे ओळखून त्यावर कारवाई करावी. कुणालाही पाठीशी घालू नका. ग्रामिण भागात शेतरस्ते मोकळे करण्यासाठी मातोश्री पाणंद रस्ते योजना राबवा, असे निर्देश त्यांनी दिले.

## चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानला आयसीसीची कडक तंबी, चाहत्यांचे पैसे परत करण्याची नामुष्की

**कराची (वृत्तसंस्था)**

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता पाकिसतानवर मोठी नामुष्की ओढवली आहे. कारण आता पाकिस्तानला चाहत्यांच्या तिकीटांचे पैसे देण्याची वेळ आली आहे. आयसीसीने यावेळी पाकिस्तानला चांगलेच दटावले असून त्यामुळे त्यांना आता चाहत्यांना तिकिटांचे पैसे परत करावे लागणार आहेत.

पाकिस्तानला चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद देऊन आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्याचे आता आयसीसीला वाटत असेल. कारण चॅम्पियन्स ट्रॉफीला आता फक्त काहीच दिवस उरले आहेत. पण तरीही पाकिस्तानची तयारी अजून पूर्ण झालेली नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पाकिस्तानने मैदानाची बांधणी करताना एक मोठी चूक केल्याचे समोर आले आहे.

पाकिस्तानने कोणती केली मोठी चूक...

पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आपल्या मैदानात मोठे बदल केले. मैदानात फलंदाजांसाठी सर्वात महत्वाची गोष्ट असते ती साईट स्क्रीन. कारण फलंदाज या साइट स्क्रीनकडे पाहून चित्त एकाग्र करत असतो. त्यामुळे फलंदाजासाठी ही सर्वात महत्वाची गोष्ट असते. पण पाकिस्तानने या मैदानात जी साइट स्क्रीन बांधलेली आहे ती निकृष्ठ दर्जाची आहे आणि ती छोटी बांधलेली आहे. त्यापेक्षा मोठी साइट स्क्रीन प्रत्येक मैदानात असते. त्यासाठी आता पाकिस्तानला नवीन साईट स्क्रीन बनवावी लागणार आहे.

**पाकिस्तानला चाहत्यांचे पैसे का परत द्यावे लागणार..**

साइट स्क्रीनच्या मागे असलेल्या जागेवर कोणालाही बसायला देत नाही. पण आता साइट स्क्रीन वाढवावी लागणार आहे. त्यामुळे जास्त जागा व्यापली जाणार आहे. यावेळी साइट स्क्रीनच्या मागे ज्या चाहत्यांनी तिकीट बूक केली असेल त्यांना आता त्यांचे पैसे पाकिस्तानला परत करावे लागणार आहे. त्यामुळे पाकिस्तानची डोकेदुखी आता जास्त वाढलेली असणार आहे.

पाकिस्तानला आता या चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. कारण एवढ्या मोठ्या स्पर्धांच्या तिकीटी शक्यतो मिळत नाहीत. त्यामुळे ज्यांची तिकीट रद्द केली जाणार, त्यांचा रोष पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळावर नक्कीच असणार आहे.

## १०वी, १२ वी कॉपीमुक्त परीक्षा; मनाई आदेश, भरारी पथकांची नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता १० व व १२ वी च्या परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च याकालावधीत होणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडाव्या यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले असून भरारी पथकांच्या नियुक्तीचे आदेशही दिले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसरात व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्र परिसराच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले आहेत. त्यानुसार परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात परीक्षार्थी, परीक्षेसाठी नेमलेले कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी वगळून अन्य कुणाही व्यक्तिस प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र परिसरात पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तिंना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. १०० **पान ३ वर...**

## ज्येष्ठांच्या मोफत देवदर्शनासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

**मुंबई :** राज्य सरकारने ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्वधर्मीय ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना भेट देता यावी यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू केली आहे. या योजनेतंर्गत मुंबई शहरातील १५०, उपनगरातील २५० अशा एकूण ४०० ज्येष्ठ नागरिकांनी अयोध्येतील श्रीराम मंदिर दर्शनाचा लाभ घेतल्याचे आता समोर आले आहे. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्रातील ६६, तर देशातील ७३ महत्वाच्या तीर्थ क्षेत्रांचे मोफत दर्शनाची सुविधा मिळते. यामध्ये महाराष्ट्रातील ६६ तीर्थ स्थळांमध्ये मुंबईतील १५, तर ठाण्याच्या २ तीर्थस्थळांचा समावेश आहे. पात्र व्यक्तीला प्रमुख तीर्थस्थळांपैकी कोणत्याही एका तीर्थयात्रेचा एकदाच लाभ घेण्याची सुविधा मिळते. पोर्टलवर ऑनलाइन किंवा स्वत: सेतू सुविधा केंद्रात अर्ज विनामूल्य भरता येतो. अर्ज भरताना अर्जदार प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक आहे. फोटो काढून केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येते. प्रत्येक तीर्थस्थळासाठी जिल्हानिहाय कोटा निश्चित केला जातो. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्ज आल्यास लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड होते. अतिरिक्त लोकांची प्रतीक्षायादी तयार केली जाते.

अर्जदार पती, पत्नीपैकी एकाची निवड झाल्यास जोडीदाराला पाठविण्याचा निर्णय जिल्हास्तरिय समिती घेते. अर्जदाराचे वय ७५ आणि त्यापुढील असल्यास सोबत जोडीदार किंवा एक सहाय्क प्रवास करू शकतो.

एका टूरसाठी ८०० प्रवासी आवश्यक असल्याने मुंबईतून फक्त अयोध्येत श्रीराम मंदिर दर्शन दूर गेली आहे. यात मुंबई व ठाण्यातून प्रत्येकी ४०० जणांचा समावेश होता. – प्रसाद खैरनार, सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग

## मध्य रेल्वेत नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने तिघांनी ज्येष्ठाला २८ लाखांनी गंडा घातला

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मध्य रेल्वेत नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने तिघांनी ज्येष्ठाला २८ लाखांनी गंडा घातला. याप्रकरणी जरीपटका पोलिसांनी तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. पृथ्वीराज दुर्योधन साखरे (वय ५२, रा. बुद्धनगर), मिलिंद कांबळे (वय ४५, रा. गणेशपेठ) आणि दीपक कवडू मोपट्टीवार (वय ६४, रा. रुद्राक्षनगर, बेसा रोड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. देवदास रामा जांभूळकर (वय ६८, रा.मायानगर, इंदोरा, जरीपटका) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, २०१३मध्ये देवदास यांची पृथ्वीराजसोबत ओळख झाली.

'माझी एका खासदाराच्या पत्नीसोबत चांगली ओळख आहे. कोणाला नोकरी लावून द्यायची असल्यास कोणत्याही अडथळ्याशिवाय काम होईल', असे पृथ्वीराजने देवदास यांना सांगितले. देवदास यांचा मुलगा विनीत हा नोकरीच्या शोधात होता. देवदास यांनी विनीतला नोकरी लावून देण्याची विनंती पृथ्वीराजकडे केली.

पृथ्वीराजने विनतीला मध्य रेल्वे किंवा सामाजिक न्याय विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर पृथ्वीराजने मिलिंद कांबळे व दीपक मोपट्टीवारसोबत देवदास यांची भेट करवून दिली. मध्य रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेळोवेळी २८ लाख रुपये घेतले. त्यांना विनीतच्या नियुक्तीचे बनावट नियुकतीपत्रही दिले. विनीत व देवदास मध्य रेल्वेच्या कार्यालयात गेले असता नियुक्तीपत्र बनावट असल्याचे त्यांना कळले.

## 'महाराष्ट्र केसरी'ची दुसरी किताबी लढतही अहिल्यानगरमध्येच रंगणार!

**अहिल्यानगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महापौर केसरी पदाच्या किताबासाठी अहिल्यानगर शहरात आयोजित महाराष्ट्र कुस्तीगीर संघाने आयोजित केलेली पृथ्वीराज मोहोळ व शिवराज राक्षे या दोघा पहेलवानांमधील लढतीचा निकाल वादग्रस्त ठरला. मात्र, असे असले तरी पहिलवानांच्या आणखी एका संघटनेने, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेने महापौर केसरी किताबासाठी पुन्हा स्वतंत्र मैदान अहिल्यानगर जिल्ह्यातच आयोजित केले आहे.

अहिल्यानगर शहरातील कुस्ती स्पर्धेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांनी केले होते तर आता दुसऱ्या महाराष्ट्र केसरी पदाच्या किताबी लढतीच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी स्वीकारले आहे.

यासंदर्भात जिल्हा तालीम संघाच्या पदाधिकाऱ्यांचे स्पर्धेच्या आयोजनाचे पत्र आमदार रोहित पवार यांनी स्वीकारले आहे. कुस्तीगिरांच्या महाराष्ट्र संघटनेत फूट पडून महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद व महाराष्ट्र कुस्तीगीर संघ अशा दोन स्वतंत्र संघटना स्थापन झाल्या आहेत.

कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भाजपचे माजी खासदार रामदास तडस आहेत तर कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष शरद पवार आहेत. मात्र या दोन्ही संघटनांकडून अहिल्यानगरमध्येच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेकडे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघाने सन २०२४-२५ च्या ६६ व्या महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची मागणी केली होती. त्याला मान्यता देण्यात आली व जिल्हा तालीम संघाने स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी आमदार रोहित पवार यांच्यावर सोपवली. तसे पत्र आमदार रोहित पवार यांना दिले.

स्पर्धेच्या आयोजनाची हे निमंत्रण जिल्हा तालीम संघाचे खजिनदार नाना डोंगरे, शहर तालीम संघाचे अध्यक्ष नामदेव लंगोटे, पाथर्डी तालुका संघाचे सचिव पप्पू शिरसाठ, शेवगाव तालुका तालीम संघाचे अध्यक्ष विक्रम बारवकर, ऋषिकेश धांडे, काका शेळके, मीठू धांडे, विजय मोढळे, असिफ शेख आदींनी आमदार रोहित पवार यांना दिले आहे. कुस्तीगीर संघाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांनी ६७ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा व किताबी लढत आयोजित केली होती तर आता कुस्तीगीर परिषदेच्या वतीने ६६ वी किताबी लढत आयोजित करण्यात आली आहे.

पहेलवानांच्या राज्य संघटनेत दोन वर्षांपूर्वी फूट पडली असली तरी दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या कुस्तीगीर संघाने थेट ६७ महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित केली आहे. त्यामुळे मान्यताप्राप्त स्पर्धा कोणाची? याबद्दल राज्यातील पहेलवानांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

कुस्तीगीर परिषदेचे पत्र प्राप्त झाल्यानंतर बोलताना आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन अत्यंत दिमाघदार व योग्य पद्धतीने करण्याची ग्वाही दिली. हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी, वस्ताद व पहेलवानांचा योग्य मानसन्मान करून ही स्पर्धा पार पाडली जाणार आहे. कुस्ती स्पर्धेचे आयोजन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्वतोपरी मदत करू असे ते म्हणाले. रोहित पवार यांच्या मार्गदर्शक खाली स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पडेल अशी अपेक्षा जिल्हा तालीम संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**हिंगोलीत अमृततुल्य व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा गौरव सोहळ्यात जागर –** महाराष्ट्रातील कुस्तीगीरांच्या फूट पडलेल्या दोन्ही संघटनांकडून महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या आयोजनासाठी अहिल्यानगरचीच निवड केली जात आहे आणि त्यातही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडलेल्याच दोन आमदारांकडून ही किताबी लढत आयोजित केली जात आहे. याबद्दल पहिलवानांमध्ये उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

कुस्तीगीर संघाच्या किताबी लढतीचा निकाल वादग्रस्त ठरला, आता कुस्तीगीर परिषदेच्या लढतीचा निकाल कशा पद्धतीने लागला जातो, याकडे लक्ष राहणार आहे. यानिमित्ताने जिल्हा कुस्तीगीर संघ व जिल्हा तालीम संघ यांच्यामध्येही डाव-प्रतिडाव खेळले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जागतिक शांती कार्य आणि भारत

भारतीय सैन्याने संयुक्त राष्ट्रांच्या 'शांतिरक्षा अभियाना'त अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या शौर्य, समर्पण आणि व्यावसायिकता यांची जगभरात प्रशंसा झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिरक्षा कार्यात सक्रिय सहभाग हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. सीरियातील अशाच शांतिकार्यात मोलाचे योगदान देऊन भारताचे नाव उज्ज्वल करणारे ब्रिगेडियर अमिताभ झा यांचे नुकतेच निधन झाले. गेल्या दीड वर्षांपेक्षाही अधिक काळ तेथील शांतता प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी ते झटत होते. ब्रिगेडियर अमिताभ झा हे सीरियातील गोलन हाइट्स येथे संयुक्त राष्ट्राच्या निर्सैनिकीकरण दलाचे (युएनडीओएफचे) डेप्युटी फोर्स कमांडर म्हणून काम करीत होते. भारतीय लष्करात 'गोरखा रायफल'चे अधिकारी म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा केली. ब्रिगेडियर झा यांना विविध खेळांतही रुची होती. ते अनेक सांघिक खेळ खेळत. पर्वतांमध्ये गिर्यारोहण करत. भारतीय लष्करात खडतर परिस्थितीत सेवा दिलेल्या झा यांचा लष्करी मुत्सद्देगिरी, भूराजकीय प्रश्न, पारंपरिक युद्धनीती या विषयांचा सखोल अभ्यास होता. सियाचेन ग्लेशियर येथे काम करताना त्यांनी त्यांच्या खंबीर नेतृत्वाने आदर्श घालून दिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या अनेकांनी पुढे विविध स्तरांवर नेतृत्वाची धुरा सांभाळली. ते एक अनुभवी आणि खंबीर नेते होते.

गोलन हाइट्स ही इस्रायल आणि सीरियामधील एक वादग्रस्त सीमा आहे. १९६७ सालच्या युद्धानंतर इस्रायलने या भागावर ताबा मिळवला. १९७३ साली झालेल्या युद्धानंतर संयुक्त राष्ट्रांनी या भागात 'यूएनडीओएफ'ची स्थापना केली. या दलाचे काम इस्रायल आणि सीरियामधील शस्त्रसंधीचे निरीक्षण करणे आहे. इस्रायल-सीरिया युद्धात बंडखोर गटांच्या वाढत्या हिंसाचारामुळे परिस्थिती संवेदनशील बनली होती. परिणामी शांतता दले आणि स्थानिक जनतेसाठी तेथील वातावरण अतिशय असुरक्षित झाले होते. सततचा बॉम्ब वर्षाव, प्रचंड प्रमाणात रक्तपात आणि अस्थिर वातावरण यामुळे सीरियामध्ये अराजक निर्माण झाले होते. अशा वातावरणात काम करतानाही ब्रिगेडियर झा यांनी त्यांच्या दायित्वाप्रती असलेल्या कटिबद्धतेचा कधीही विसर पडू दिला नाही. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात युद्धबंदी कराराची कार्यवाही, मानवतावादी दृष्टिकोनातून साहाय्य, युद्धसदृश परिस्थितीत अडकून पडलेल्या सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेची खबरदारी घेणे इत्यादी दायित्व सक्षमपणे पार पाडले. अतिशय गुंतागुंतीची नाजूक परिस्थिती असतानाही त्यांची कर्तव्याप्रतीची निष्ठा कायम राहिली.

गोलान हाइट्स हा इस्रायल आणि सीरियामधील खूप पूर्वीपासूनचा बफर झोन आहे. योम किप्पूर युद्धानंतर १९७३ साली इस्रायल आणि सीरियामध्ये 'निर्सैनिकीकरण करार' झाला. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांनी,गोलान हाइट्स हा बफर झोन असल्याचे आणि तो यूएनडीओएफच्या देखरेखीखाली राहील, असे घोषित केले. गोलान हाइट्स येथे नेमणूक होण्यापूर्वी ते डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शिष्टमंडळात 'लष्करी निरीक्षक' म्हणून कार्यरत होते. ब्रिगेडियर झा यांच्या नेतृत्वाखाली 'यूएनडीओएफ'ने गोलन हाइट्समध्ये शांतता आणि स्थिरता राखण्यासाठी इस्रायल आणि सीरिया यांच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधून तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्थानिक जनतेला साहाय्य करण्यासाठी अनेक सामाजिक आणि मानवतावादी कार्य केले. ते एक खंबीर आणि अनुभवी सैनिक होते. आपल्या सहकाऱ्यांचे मनोबल वाढवण्यामध्ये ते अखेरपर्यंत निग्रही आणि प्रयत्नशील राहिले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आणि मृत्यूची खात्रीच असलेल्या प्रदेशातही जागतिक शांततेसाठी प्रत्येक संकटाला नेटाने तोंड देण्याविषयीची त्यांची निष्ठा प्रेरणादायी आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये सेवा देताना आतापर्यंत १७९ भारतीय सैनिकांनी प्राण गमावले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या सनदीमध्ये सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी संयुक्त कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत. 'संयुक्त राष्ट्र शांती सेने'ची स्थापना १९४८ मध्ये झाली. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिरक्षा अभियानात भारताचा एक गौरवशाली इतिहास आहे. भारत संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य आहे आणि तेव्हापासून जागतिक शांतता अन् सुरक्षितता राखण्यासाठी वचनबद्ध आहे. भारतीय सैनिक केवळ लढाऊ भूमिकेतच नव्हे, तर वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि 'लॉजिस्टिक सपोर्ट'मध्येही (उत्पादनाची वाहतूक आणि साठवणूक यांमध्येही) महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भारतीय लष्कराच्या महिला तुकड्यांनीही संयुक्त राष्ट्रांच्या अभियानात प्रशंसनीय काम केले आहे.

# दुर्गा नारायण भागवत या समाजशास्त्रज्ञ तथा बौद्ध साहित्य अभ्यासक

**(दुर्गा नारायण भागवत जयंती विशेष)**

दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकौशल्यांची ज्ञानवर्धक माहिती श्री.एन. कृष्णकुमारजींच्या या शब्दशैलीतून... संपादक.

दुर्गा नारायण भागवत या भारतीय विद्वान व समाजवादी लेखिका होत्या. त्यांनी संस्कृत आणि बौद्ध साहित्याचा अभ्यास करून आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मध्य प्रदेशातील जंगलात वेळ घालवला. नंतर त्या संशोधक म्हणून मुंबईत परतल्या आणि मराठीत पुस्तके लिहिली. मराठीतील त्या अग्रगण्य महिला दलित लेखिका आहेत. आणीबाणीला विरोध करणाऱ्या प्रमुख लेखकांपैकी त्या एक होत्या. आज त्या नवलेखिकांच्या प्रेरणास्रोत ठरत आहेत. पद्मश्री आणि ज्ञानपीठ यांसारखे संस्थात्मक आणि नागरी सन्मान स्वीकारण्यापासूनही त्यांनी स्वतः ला दूर ठेवले. दुर्गा भागवतजी यांची काही प्रसिद्ध पुस्तके अशी- १) ॲन आउटलाइन ऑफ इंडियन फोकलोअर २) रिडल इन इंडियन लाईफ ३) लोअर अँड लिटरेचर ४) अ डायजेस्ट ऑफ कंपरेटिव्ह फिलॉलॉजी ५) रोमान्स इन सॅक्रिड लोअर ६) अ प्रायमर ऑफ अँथ्रॉपॉलॉजी ७) अर्लि बुद्धिस्ट ज्युरिस्प्रुडन्स इत्यादी इंग्रजी ग्रंथ, तर ८) हेन्री डेव्हिड थोरो यांच्या ग्रंथांचे मराठी अनुवाद- पैस ९) व्यासपर्व १०) डूब ११) ऋतुचक्र १२) महानदीच्या तीरावर १३) पूर्वा १४) रूपरंग १५) लोक साहित्याची रूपरेखा १६) धर्म व लोकसाहित्य १७) भावमुद्रा १८) केतकरी कादंबरी १९) प्रासंगिका आणि २०) जनतेचा सवाल आदी मराठी पुस्तके आहेत.



दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. दुर्गा भागवतजींचा जन्म दि.१० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, अहमदनगर, नाशिक, पुणे अशा विविध ठिकाणी झाले. त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून सन १९३२मध्ये बीए परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे सन १९३५ साली त्यांनी एमएची पदवी संपादन केली. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतही भाग घेतला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दुर्गाजींनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्समध्ये समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून दोन वर्षे काम केले. काही दिवसांनी त्यांनी 'साहित्य सहकार' या मासिकाचे संपादनही केले. त्यांनी लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र या विषयांवर विपुल प्रमाणात संशोधनात्मक लेखन केले आहे. या विषयांवरील त्यांचे बरेचसे ग्रंथ इंग्रजीमध्ये आहेत. त्यांनी वैचारिक व समीक्षात्मक लेखनही केले आहे. साने गुरुजींच्या प्रेरणेतून त्या ललित लेखनाकडे वळल्या आणि आपल्या ललित लेखनाद्वारे त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

दुर्गा भागवत स्वलेखनाच्या कट्टर पुरस्कर्त्या आहेत. त्यासाठी त्यांनी आणीबाणीच्या काळात सन १९७५-७७मध्ये कारावासही भोगला होता. साहित्यिक व विचारवंत यांनी शासकीय पुरस्कार स्वीकारून शासनाचा मिंधेपणा पत्करू नये, असे त्यांचे ठाम व करारी मत होते. अनेक सामाजिक चळवळींतही त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या 'पैस' या ग्रंथाला 'साहित्य अकादमी' पुरस्कार लाभला आहे. सन १९७५मध्ये कराड येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अभिजात रसिकता, सौंदर्यासक्ती, जीवनोत्सुक आशाप्रवण वृत्ती, तीव्र संवेदनशीलता, काव्यात्मकता व मर्मग्राही कुतूहल यांचे अपूर्व रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असून त्यांच्या साहित्यातही त्याचे प्रतिबिंब पडले आहे. या सर्वांना त्यांचा सखोल व्यासंग व मार्मिक विश्लेषण यांची जोड मिळाली आहे; त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक आगळा आशय व प्रगल्भता प्राप्त झाली आहे. दुर्गा भागवतजी यांचे निर्वाण दि.८ मे २००२ रोजी मुंबई येथे झाले. त्यांचे साहित्य आज महिला साहित्यिकांना प्रचंड ऊर्जा पुरवित आहे, हे येथे उल्लेखनीय!

!! त्यांच्या गौरवशाली लेखन कौशल्याला जयंतीदिनी विनम्र अभिवादन !!

# सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संचालक आपत्ती व्यवस्थापन प्रभाग व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलाच्या निर्देशानुसार बोअरवेल्स संदर्भात मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. यासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण विभाग यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केल्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

सदर आदेशात नमूद केले आहे की ,उघड्या बोअरवेल यांना अनिवार्यपणे सिल करणे, जेणेकरुन त्याठिकाणी जाण्यास मज्जाव होईल. यासाठी संबंधित जमीन मालक आणि ड्रिलिंग एजन्सी यांची जबाबदारी निश्चित करावी, सर्व बोअरवेल्स यांच्या नोंदणीची प्रणाली स्थापन करणे आवश्यक आहे. उघड्या बोअरवेल संबंधी असलेली जोखीम व लहान मुलांची सुरक्षा याबाबत व्यापक जनजागृती मोहिम राबविणे. बोअरवेल ऑपरेटर्स किंवा जमीन मालक यांनी बोअरवेलच्या सभोवताली सुरक्षेच्या अनुषंगाने अडथळे निर्माण करणे. असुरक्षित बोअरवेल ओळखण्यासाठी व त्यासंबंधी निराकरण करण्यासाठी समुदाय संचलित यंत्रणा कार्यान्वित करणे. सर्वोच्च न्यायालय यांनी जारी केल्याप्रमाणे बोअरवेल सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधिताकडून कठोर दंड आकारणी करण्यात्येनार आहे. सुरक्षा नियमांचे पालन होते किंवा कसे याबाबत खात्री करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियमित तपासणी करणेआवश्यक आहे.

या आदेशाची अवज्ञा झाल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये कोणतीही व्यक्ती संस्था, अथवा समूह यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे विनोद खिरोळकर यांनी आदेशाद्वारे कळविले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी - एक खोडसाळपणा की योजनाबद्ध षडयंत्र?

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आणि संपूर्ण भारताचे अभिमानस्थान आहेत. स्वराज्य स्थापनेपासून ते औरंगजेबाशी केलेल्या प्रतिकारापर्यंत त्यांचे कार्य महान आहे. मात्र,अलीकडच्या काळात काही लोक शिवरायांच्या कार्याची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत.यात अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी नुकतेच वादग्रस्त वक्तव्य केले ते म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्याहून सुटका करुन घेण्यासाठी औरंगजेबाला लाच दिली होती.या विधानाने महाराष्ट्रातील अनेक नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत.शिवाजी महाराज हे केवळ तलवारीच्या जोरावर नव्हे,तर धोरणी बुद्धिमत्ता आणि पराक्रमाने इतिहास घडवणारे योद्धा होते. त्यांनी लाच दिल्याचा कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही,तरीही अशा प्रकारची विधानं करून त्यांच्या चरित्रावर डाग टाकण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे हा खोडसाळपणा आहे की योजनाबद्ध षडयंत्र..?. याचा विचार करणे आवश्यक आहे.

**शिवाजी महाराजांची बदनामी का केली जाते?**- छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी हिंदवी स्वराज्याची संकल्पना मांडली.त्यांनी जुलमी आणि अन्यायी सत्ताधाऱ्यांविरोधात संघर्ष केला.त्यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघलांपासून स्वातंत्र्य मिळवले आणि एका सशक्त स्वराज्याची पायाभरणी केली.मात्र,इतिहासात अनेक वेळा असे दिसून आले आहे की, स्वाभिमानी नेतृत्व असलेल्या महापुरुषांची बदनामी करण्यासाठी काही प्रवृत्ती सतत सक्रिय असतात.शिवरायांना बदनाम करण्यामागे दोन प्रमुख कारणे असू शकतात.

**१) इतिहासाचा विपर्यास करून चुकीची माहिती पसरवण्याचा प्रयत्न:** काही मंडळी हेतुपुरस्सर चुकीच्या गोष्टी पसरवून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करू पाहतात. त्यामुळे त्यांना महापुरुषांचा खरा इतिहास माहीत नसल्यासारखे भासवले जाते.

**२) बहुजन समाजाच्या आत्मसन्मानावर घाला घालण्याचा प्रयत्न:** शिवाजी महाराज हे बहुजन समाजासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या संघर्षातून आणि पराक्रमातून अनेकांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा मिळते.त्यामुळे त्यांच्या प्रतिमेवर डाग टाकण्याचा प्रयत्न केला जातो,जेणेकरून समाज अस्थिर राहील.

**शिवाजी महाराज आणि आग्रा सुटका – सत्य काय आहे?**

राहुल सोलापूरकर यांनी दावा केला की,महाराजांनी औरंगजेबाला लाच देऊन आग्र्यातून सुटका करून घेतली.पण इतिहास सांगतो की,शिवाजी महाराजांनी अतिशय नियोजनबद्ध रीतीने आग्र्याहून सुटका केली.

**१) मिठाईच्या पेटाऱ्यांची युक्ती:** शिवाजी महाराजांनी स्वतःसाठी मृत्यूची अफवा पसरवली आणि त्यानंतर मोठ्या रणनीतीने मिठाईच्या पेटाऱ्यांमध्ये आपले सैनिक आणि विश्वासू साथीदार लपवले.याच युक्तीने त्यांनी नजरकैदेतून सुटका करून घेतली.

**२) औरंगजेबाच्या डोळ्यात धूळ फेकणे:** औरंगजेबाने शिवाजी महाराजांना कैदेत ठेवले होते.त्यांना नजरकैदेत ठेवून त्यांचा प्रभाव संपवायचा हा औरंगजेबाचा कट होता.मात्र, महाराजांनी अत्यंत हुशारीने आणि योजनाबद्ध पद्धतीने त्याच्या तावडीतून सुटका मिळवली.

**३) सैनिकांच्या मदतीने केलेली योजना:** शिवाजी महाराजांसोबत असलेल्या मावळ्यांनी आणि समर्थकांनी आग्र्यातील मुघल सैन्याच्या हालचालींचा अभ्यास करून सुटकेची संधी साधली.यात कुठेही लाच दिल्याचा उल्लेख आढळत नाही.यावरून स्पष्ट होते की, शिवाजी महाराज हे केवळ तलवारबाज नव्हते तर बुद्धिमान युद्धनितीकार होते.लाच देऊन सुटका करून घेणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. इतिहासाची तोडमोड करणाऱ्या प्रवृत्तींचा पर्दाफाश करायला हवा. शिवाजी महाराजांचा अपमान करणारे लोक हे जाणून-बुजून असे विधान करत असतात.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दोन महापुरुष आहेत, ज्यांच्या विचारांमुळे बहुजन समाजाला आत्मसन्मानाने उभे राहण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळेच काही समाज विघातक शक्ती या दोन महापुरुषांना सातत्याने लक्ष्य करत असतात.

**१) आधी बाबासाहेबांचा अपमान,आता शिवरायांचा:** काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला होता.आणि आता शिवरायांविषयी अपमानास्पद वक्तव्य करण्यात आले आहे.यामागे कुणाचा तरी ठरवून केलेला कट असल्याचा संशय येतो.

**२) मुख्यमंत्री आणि सरकारने कठोर पावले उचलावीत:**महाराष्ट्र सरकारने आणि केंद्र सरकारने अशा प्रकारच्या वक्तव्यांवर कठोर कारवाई करायला हवी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी या वक्तव्याची गंभीर दखल घेतली पाहिजे.

**३) जनतेने आवाज उठवला पाहिजे:** बहुजन समाजाने आणि समस्त शिवभक्तांनी अशा प्रवृत्तींविरोधात कडक भूमिका घेतली पाहिजे. केवळ सोशल मीडियावर संताप व्यक्त करून उपयोग नाही,तर यासाठी जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे.

**बहुजन समाज किती काळ सहन करणार?**– ४०० वर्षांनंतरही शिवाजी महाराज यांची बदनामी केली जाते,हे दुर्दैवी आहे.अशा प्रकारच्या घटना पुन्हा-पुन्हा घडतात आणि समाज गप्प राहतो,हे अधिक दुर्दैवी आहे. शिवरायांचा अपमान करणाऱ्यां विरोधात कठोर कारवाई होण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, अन्यथा जनता स्वतःच आवाज उठवेल. महाराष्ट्रातील जनता शिवरायांवर प्रेम करणारी आहे, त्यामुळे शिवरायांची बदनामी करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे.आज शिवरायांचा अपमान सहन केला तर उद्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फुले-शाहू महाराजांचा अपमान करण्यासही हीच प्रवृत्ती पुढे सरसावेल.त्यामुळे समाजाने जागरूक राहून,अशा प्रकारच्या षडयंत्रांना तोंड द्यायला हवे.

**– रतनकुमार साळवे**
९९२३५०२३२०,
संपादक - दैनिक,'निळे प्रतीक'
छत्रपती संभाजीनगर

## शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज आजही आहे

शिवाजी महाराजांनी जेव्हा राज्याभिषेक केला,तेव्हा अनेक लोकांनी त्याला विरोध केला होता. काहींनी त्यांना 'शूद्र राजा' म्हणून हिणवले.पण त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने संपूर्ण भारताला एक नवे नेतृत्व दिले. आजही समाजातील काही प्रवृत्ती शिवरायांचा अपमान करण्याचा प्रयत्न करत आहेत.

मात्र,शिवाजी महाराजांचे विचार आजही तितकेच प्रबळ प्रेरणादायी आहेत.त्यांचे धोरण,नेतृत्व आणि कार्य यांचा अभ्यास करून तरुण पिढीने त्यांचा आदर्श घ्यायला हवा.

१) राजकीय स्वार्थापोटी महापुरुषांचा अपमान बंद व्हावा:काही लोक आपल्या स्वार्थासाठी महापुरुषांच्या चरित्राची बदनामी करतात. हा प्रकार रोखण्यासाठी समाजाने एकत्र येऊन आवाज उठवणे गरजेचे आहे.

२) शिवचरित्राचा अभ्यास करून सत्य समजून घ्या:इतिहासाच्या चुकीच्या गोष्टी पसरवल्या जात आहेत.त्यामुळे नव्या पिढीने मूळ इतिहासाचा अभ्यास करावा आणि सत्य काय आहे, हे समजून घ्यावे.

# अवैध धंद्यावर अंकुश ठेवणारा छत्रपती संभाजीनगरचा आका कोण?

# धुरडा उडवणाऱ्या विनानंबर रेती हायवावर कारवाई कधी होणार? ; सर्वसामान्यांचा प्रश्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अवैध धंद्यासाठी वापरल्या जात असलेल्या विनानंबरच्या रेती 'हायवा'वर कारवाई करण्यात यावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे. परंतु बोलू तरी काय होणार म्हणून सर्व सामान्य माणूस या 'धनदांडग्या' गुंडगिरी करणाऱ्यांवर बोलणे तसेच आवाज उठवणे थांबवतो याचाच फायदा हे 'डॉन' लोक घेत असतात. देवळाली तसेच बीड बायपास येथे अनेक कामे चालू आहेत. तसेच अनेक विनानंब रच्याा हायवांच्या माध्यमातून बांधकाम साहित्याची हेराफेरी होते. सर्व प्रकारावरून असे दिसते.यासर्व अवैध कामाला कोणाचा वरद हस्त आहे. अवैध धंद्यावर अंकुश ठेवणारा छत्रपती संभाजीनगरचा आका कोण? असा प्रश्न आता सर्वसामान्यांना पडू लागला आहे.

वाहतूक पोलिसांना हे दिसत कसे नाही. अशा वाहनांचा वेगही जास्त प्रमाणत असतो. अगोदरच धुळधाण असलेल्या रस्त्यावर सुसाट वाहने चालवत धुराडा उडवत ही विनानंबरची वाहने फिरतातच कशी? असा प्रश्न का पडत नाही. यावरून साहजिकच आहे की, 'आर्थिक व्यवहार' तर झाला नसावाना....शेवटी विचार करण्यापर्यंतच सर्वसामान्य मजल मारू शकतात. बाकी सर्व व्यर्थ आहे.






**भर दिवसा उन्हाच्या कडाक्यात धुरडा उडवत अवैध वाहतुकीसाठी कर्णकर्कश हॉर्न वाजवत निघालेला विनानंबर प्लेटचा 'हायवा'**

## कारवाईसाठी अधिकचा पुढाकार घ्यावा....

दुचाकी वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी सर्वच वाहतूक अधिकारी, कर्मचारी टपून बसलेले असतात. यात मात्र काही चूक नाही. जे चुकीचे आहे ते चुकीचे परंतु दुसरीकडे हे बीनबोभाट अवैध वाहतूक करणाऱ्या विनानंबरच्या हायवावर करवाई का? केली जात नाही. आता असा कोणता 'आका'पैदा झाला आहे की त्याला आपली पोलिस यंत्रणा घाबरत आहे. दुचाकी स्वारावर तसेच इतर खासगी वाहतूक करणाऱ्यांना नियम आहेत. यांना नियम नाहीत का? एखादी कारवाई आपण केली तर त्याचा गवगवा देखील आम्ही पत्रकारीतेच्या माध्यमातून करतो. परंतु अशा अवैध कामावरदेखील आमचे कर्तव्य आहे की, हा सर्व प्रकार आपणांना दिसत असताना देखील आपण ते जर न पाहत नसाल ते दाखविणे आमचे कर्तव्यच आहे. आपण यावर योग्य कारवाई कराल अशीच अपेक्षा सर्वांना आहे आणि आकाचे हातपाय जास्त पसरणार नाही याची काळजी घ्यावी.

## कायदा सर्वांसाठी सारखा असवा

अशा वाहनांवर कारवाई किंवा पर्याय काय, टाफिक वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक, आहेतच , आजुन वाहतुकीची कोंडी, व्यवस्था साठी , सहाय्यक पोलिस आयुक्त हि आहेतच, प्रत्येक पॉईटवर वाहतुक शाखेचे पोलिस तैनात करण्यात आले आहेत हेही तितकेच खरे आहे,' पण कारवाई करणार कोण? हा ही मोठा प्रश्न आहे,' कोणाच्या आदेशाची वाट बघायची आहे, कोणाचा दबाव तंत्र वापरून सर्व काही सुरु आहे,' कोणत्या आकाची छत्रपती संभाजीनगर चलती आहे, हे पण उजेडात येणे गरजेचे आहे, कारण कायदा सर्वांसाठी आहे हेही तितकेच खरे आहे नुसती म्हणच ठरायला नको?

# सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची अध्यक्षपदी डॉ. शोएब हाश्मी यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीची बैठक बुधवारी (दि. ५) क्रेझी बाईट येथील सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी यंदाच्या महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी डॉ. शोएब हाश्मी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

शिवजन्मोत्सव सोहळ्याचे यंदाचे हे पाचवे वर्ष असून महोत्सव समितीचे यंदाचे अध्यक्षपद सर्वानुमते एशियन हॉस्पिटलचे डॉ. शोएब हाश्मी यांना सोपविण्यात आले आहे. ही निवड शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे संस्थापक अध्यक्ष विशाल विराळे पाटील, संस्थापक कार्याध्यक्ष गणेश ढगे पाटील, सचिव राजू वाघमारे, सरचिटणीस हर्षल आघाव, पियुष भुंगे, संकेत कानडे, इस्माईल खान, वैभव गाडेकर, ज्ञानेश्वर जाधव यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या वर्षीच्या समिती कार्याध्यक्षपदी मदन देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. तर समितीला मुख्य मार्गदर्शक सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख हे लाभले आहेत. समिती सचिवपदी अखिल शेख यांची निवड करण्यात आली असून समितीचे प्रमुख आकर्षण असणारे महाराजांचा पाळणा हलवण्याचे कार्यक्रमाचे प्रमुख डॉक्टर दिव्या पाटील यांची निवड करण्यात आली आहे. समितीला बबन डिडोरे पाटील, डॉ.मयूर सोनवणे, सुहास दाशरथे, हर्षवर्धन कराड, अनुराग अतुल सावे यांचे मार्गदर्शन लाभले आहेत. यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यात सामाजिक कार्यक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपत शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे.

# संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन- बालाजी सोनटक्के




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा माघ पोर्णिमा दि. १२/०२/२०२५ रोजी चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. सदर जयंती निमित्ताने शहरात विविध वॉर्डात प्रतिमा पुजन, ध्वजारोहन, आरती, अभिवादन / कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यासाठी केंद्रिय जयंती उत्सव समित्तीची निवड करण्यात आलेली आहे. सदर कार्यकारिणीच्या वतीने खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के यांनी सांगितले.

दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी १०:०० या रामनगर, मुकुंदवाडी येथील रविदास महाराज मंदिरापासून मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर रॅली मुकुंदवाडी रविदास महाराज चौक कॉर्नर क्रांती चौक-पैठण गेट -औरंगपुरा-शाहू महाराज चौक-मिलकॉर्नर-भडकल गेट- अण्णा भाऊसाठे चौक, कलेक्टर ऑफीस - संभाजी महाराज चौक, टि.व्ही. सेंटर ते संत रविदास मंदिर एन-२ सिडको येथे विसर्जन होणार आहे. चौक सदर रॅलीचे उदघाटन मा. खासदार चंद्रकांत खैरे साहेब यांच्या हस्ते होणार आहे. दि. ११/०२/२०२५ रोजी सायंकाळी ७ ते रात्री १०.० वाजे पर्यंत टि.व्ही सेंटर येथे अरूण खरात यांचे गित गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे. १२/०२/२०२५ रोजी एन-९ टि. व्ही. सेंटर येथील रविदास मंदिरात ध्वजारोहन व पुजन होणार आहे. शहरात, रोहीदासपुरा मुकुंदवाडी रामनगर, जवाहर कॉलनी, सातारा परिसर, सातारा गाव, बन्सीलाल नगर, पदमपुरा, बजाजनगर येथील संत रविदास मंदिरामध्ये आरती व भंडाऱ्याचे विविध कार्यक्रम स्पर्धा, रक्तदान शिबीर यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सायंकाळी ५ ते १० वेळेत क्रांती चौकातून संत रविदास महाराजाचे प्रतिमेची भव्य शोभ यात्रा / मिरवणुक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणूकेचे उदघाटन पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते होणार आहे. सदर मिरवणूकीत शहरातील विविध वार्डातून रथ व वाहने सहभागी होणार आहे. मिरवणुकीचे सांगता औरंगपुरा येथील महात्मा ज्योतीबा फुले पुतळा येथे होणार आहे. तरी सदर जयंती उत्सव आनंदात व उत्साहात साजरा करण्यासाठी व रविदास महाराजाचे विचार समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहचण्याच्या दृष्टीणे कार्य करण्याचे समितीने

# जिल्हा शिवजयंती उत्सव समिती जाहीर; डॉ. अमर देशमुख अध्यक्षपदी, तर योगेश केवारे पाटील उपाध्यक्षपदी




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. अमर देशमुख, संस्थापक अध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा जयंती उत्सव समिती मा. योगेश केवारे पाटील, संस्थापक उपाध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा जयंती उत्सव समिती, मा. अशोक वाघ पाटील संस्थापक सचिव, छत्रपती शिवाजी म हाराज जिल्हा जयंती उत्सव समित मा. गणेश उगले पाटील कार्याध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा जयंती उत्सव समित मा. राहुल भोसले, सरचिटणीस, छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा जयंती उत्सव समित उत्सव समिती, यांनी जिल्हा शिवजयंती उत्सव समिती खालीलप्रमाणे जाहिर केली आहे.





मा. कृष्णा पवार पाटील जिल्हा उत्सव समिती अध्यक्षपदी निवड, मा. मुकेश खोतकर जिल्हा उत्सव समिती उपाध्यक्ष, मा. रहिम शेख उत्सव समिती स्वागताध्यक्ष, मा. राजेश पाटील उत्सव समिती कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

शिवजयंती सप्ताह आयोजित केलेला असून शिवजयंती सप्ताहाची सुरुवात जिल्हा परिषद शाळा जडगाव येथे दिनांक १२/२/२०२५ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक व्याख्यान डॉक्टर बालाजी जाधव यांचे होणार आहे. दिनांक १३/२/२०२५ रोजी किमया गोशाळा डोणगाव रोड तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे सहा महिने पुरेल असा चारा वाटप होणार आहे दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यू गजानननगर गारखेडा परिसर येथे महिलांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन केलेले असून महिलांच्या स्पर्धा होणार आहेत व बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी बाबासाहूब बालक आश्रम एच. आय. व्ही. ग्रस्त बालाजी नगर येथे अन्नदान व साहित्य वाटप होणार आहे. दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी मातोश्री वृद्धाश्रम नक्षत्रवाडी पैठण रोड येथे अन्नदान व साहित्य वाटप होणार आहे. दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी जय भवानी पेट्रोल पंप शेजारी ए.पी.आय. कॉर्नर येथे दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी पर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत मोफत रोग निदान शिबिर व औषधी वाटप कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मा. अतुल सावे साहेब, इतर मागास बहुजन कल्याण दुग्धविकास व अपरंपारिक ऊर्जा विभाग मंत्री महाराष्ट्र तथा पालकमंत्री नांदेड यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी वेरूळ इथून क्रांती चौक पर्यंत म्हशाल रॅली निघणार असून ती वेरूळ, खुलताबाद, दौलताबाद, शरणापुर, मिटमिटा, पडेगाव, बाबा पेट्रोल पंप मार्गे क्रांती चौक येथे समारोप होणार आहे. तसेच रात्री बारा वाजता क्रांती चौक येथे फटाक्यांची भव्य दिव्य आतिषबाजी सोहळा होणार आहे. दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी क्रांती चौक येथे ध्वजारोहण होणार आहे व सायंकाळी ५.५० वाजेपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समितीच्या वतीने मान्यवरांचे सत्कार समारंभ होणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**